**संगणक अर्हता परीक्षेस मुदतवाढ देण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्रमांक मातंसं/नस्ती ०४/२२४ /३९,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ५ मे, २००७

**वाचा :-** १) सा.प्र.वि, शासन निर्णय, क्रमांक प्रशिक्षण २०००/प्र.क्र. ५/२००१/३९, दि.२० जुलै, २००२,
२) सा.प्र.वि, शासन निर्णय, क्रमांक मातंसं/नस्ती ०४/२२४/३९, दि.२६ मे, २००४,
३) सा.प्र.वि, शासन निर्णय, क्रमांक. मातंसं/नस्ती ०४/१४/३९, दि. ८ जुलै, २००४,
४) सा.प्र.वि, शासन निर्णय, क्रमांक. मातंसं/नस्ती ०४/२२४/३९, दि. ७ जुलै, २००५ व दि. ९ जून, २००६

**प्रस्तावना :-** उपरोक्त शासन निर्णयान्वये शासकीय सेवेतील गट-अ, गट-ब व गट-क मधील अधिकारी/ कर्मचाऱ्यांनी संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण करुन शासनास प्रमाणपत्र सादर करण्यासाठी दिनांक ३१.१२.२००६ पर्यन्त मुदत देण्यात आलेली आहे. तथापि शासनाकडे उपलब्ध असलेली संगणक संख्या व शासकीय अधिकारी/कर्मचाऱ्यांची एकूण संख्या विचारात घेता राज्यातील सर्व अधिकारी/कर्मचाऱ्यांना संगणक अर्हता परिक्षा प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठी अधिक अवधी देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

***शासन निर्णय :-***

संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण करुन शासनास प्रमाणपत्र सादर करावयाच्या अवधीस दिनांक ०१.०१.२००७ पासून दिनांक ३१ .१२.२००७ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे. शासकीय सेवेतील गट-अ, गट-ब व गट-क मधील अधिकारी/ कर्मचाऱ्यांनी संगणक अर्हता परिक्षा उत्तीर्ण करुन शासनास प्रमाणपत्र सादर करण्यासाठी ही अंतीम मुदतवाढ समजण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००७०५०५१२२२०८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(भ.प्र. सिंह)
संचालक (मात) तथा सह सचिव

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
उपमुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मुख्य सचिव यांचे खाजगी सचिव,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,
प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई
प्रबंधक, उच्च न्यायालय (अपिल शाखा), मुंबई,
प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई,
महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र, नागपूर,
महालेखापाल-१ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल-२ (लेखा परीक्षा) महाराष्ट्र, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई / वांद्रे (पूर्व), मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
सर्व पोलीस आयुक्त,
सर्व विभागीय आयुक्त,
सर्व महानगरपालिकांचे आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषद / नगरपालिकांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व नगरपरिषदांचे मुख्याधिकारी,
व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्यादित, पहिला मजला, व्यवसाय शिक्षण प्रशिक्षण इमारत,
सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई,
मंत्रालयीन विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
निवड नस्ती (२ प्रती).

ROTA/H 600 (3500-5-07).

******